# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd : 1962
NAAC 'A' Grade

## 55 वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- शिवाजी विद्यापीठाचा 55 वा दीक्षान्त समारंभ साधारणपणे डिसेंबर 2018 ते जानेवारी 2019 दरम्यान नियोजित आहे
- ऑक्टोबर 2017 व एप्रिल 2018 सत्रातील आणि **यापूर्वीच्या** अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी /पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षान्त अर्ज करणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| **1** | **13 ऑगस्ट 2018 ते 12 सप्टेंबर, 2018 पर्यंत शुल्क** | **रू.250/—** |
| **2** | **13 सप्टेंबर, 2018 ते 27 सप्टेंबर 2018 पर्यंत विलंब शुल्क** | **रू.350/—** |
| **3** | **28 सप्टेंबर 2018 ते 12 ऑक्टोबर 2018 पर्यंत अतिविलंब शुल्क** | **रू 850/—** |

- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज (Convocation Application) www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन भरून त्याची प्रिंट घ्यावी व अंर्जासोबत आयडेंटीटी साईज दोन फोटो,आधारकार्डची सत्यप्रत आणि अंतिम वर्षाच्या गुणतक्त्याची प्रमाणित प्रती जोडाव्यात. अर्जामध्ये पत्ता पूर्ण आहे किंवा नाही याची खात्री करून घ्यावी आणि भरलेला अर्ज दीक्षांत विभागात समक्ष अथवा पोष्टाने तात्काळ जमा करावा.

**ऑन लाईन अर्ज भरताना प्रथम वेबसाईटवरील सूचना वाचाव्यात.**

- ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत अशा परीक्षांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. त्या परीक्षांचे पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑन लाईन प्रोसेस होतील.
- दीक्षान्त अर्ज ऑन लाईन भरताना जे विद्यार्थी 2006 पूर्वी उत्तीर्ण आहेत, त्यांनी स्वतःच्या फोटोची JPEG file अपलोड करून नंतरच अर्ज ऑन लाईन भरावा. सदरचा फोटो पदवी प्रमाणपत्रावर Black & White रंगात छपाई होईल. **विद्यार्थ्यांनी आधारकार्ड नंबर अर्जामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.**
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांचा ई—मेल आयडी व भ्रमणध्वनी कमांक नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षान्त समारंभाचे निमंत्रणपत्र व तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना SMS द्वारे कळविण्यात येईल. ऑन लाईन पैसे भरण्यासाठी खालील बॅंकेच्या खात्यावर पेमेंट गेट—वे सुविद्या उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.नं | बॅंकेचे नांव | IFSC Code | Account No. |
|---|---|---|---|
| 1 | **AXIS BANK** | **UTIB0000134** | **915020055386875** |

- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam. नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षान्त अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. (उदा. M.Phil/Ph.D etc.) पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षान्त अर्ज 30 नोव्हेंबर 2018 पर्यंत रू 850/— शुल्काने स्वीकारले जातील.
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांचा निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षान्त अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार पोहचू शकला नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही
- दीक्षान्त समारंभापूर्वी यादी विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल.
- **अपु—या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

दीक्षान्त विभाग

दि: 10/08/2018

**श्री महेश काकडे**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ